# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
(Formerly University of Pune)

Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in,Phone No.: 020-25621440


## परिपत्रक क्र. ०९/२०२६

**विषय : पुणे ग्रँड चॅलेज टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर मा.जिल्हाधिकारी पुणे यांच्या आदेशानुसार बंद ठेवण्यात आलेल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजीच्या हिवाळी सत्र २०२५ मधील नियोजित विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांच्या पुनर्आयोजनाबाबत.**

**संदर्भ :** १. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांचे दिनांक १७.०१.२०२६ रोजीचे पत्र.
२. कार्यालयीन सुट्टी विद्यापीठ परिपत्रक क्र.०८/२०२६, जा.क्र.एएन/१८२, दिनांक १८.०१.२०२६.
३. विशेष परीक्षा विद्यापीठ परिपत्रक क्र.१०४/२०२२, जा.क्र.परीक्षा समन्वय/३२६, दिनांक ०४ जुलै, २०२२.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांच्या संदर्भ जावक क्र.आव्यप्रा/१७/२०२६, दिनांक १७.०१.२०२६ रोजीच्या आदेशानुसार पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने **पुणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी नगर घोले रोड, विश्रामबाग वाडा कसबा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध बाणेर, कोथरुड बावधन, सिंहगड रोड, वारजे कर्वेनगर या क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील महाविद्यालये** बंद ठेवण्यात आलेली आहेत.

या पार्श्वभूमीवर **उपरोक्त परिच्छेद क्र.०१ मध्ये नमूद क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील** बंद ठेवण्यात आलेल्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजीच्या परीक्षा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम ४८ व उपरोक्त संदर्भ क्र.०३ मधील तरतुदींस अनुसरुन पुनर्आयोजित करण्यात येतील. या संदर्भातील पुर्ननियोजित वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

तसेच २० जानेवारी ते २३ जानेवारी, २०२६ या कालावधीतील संबंधित उपक्रमाच्या आयोजनाबाबत महाविद्यालये बंद ठेवण्याचे मा.जिल्हाधिकारी यांचे आदेश प्राप्त झाले तर याबाबत अशीच कार्यवाही करण्यात येईल.

(प्रा.डॉ.प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

परीक्ष समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र. ३६, दिनांक: १८.०१.२०२६

Scanned with OKEN Scanner

**प्रति,**
**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था**
**पुणे शहर**

**प्रत माहितीसाठी:**

१) मा.कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.प्रभारी अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
४) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग.
५) उपकुलसचिव, गोपनीय व बारकोड कक्ष, परीक्षा विभाग.
६) उपकुलसचिव, गोदाम कक्ष, परीक्षा विभाग.



Scanned with OKEN Scanner

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

## (आपत्ती व्यवस्थापन कक्ष)

दूरध्वनी क्र.020-26123371
E-Mail- controlroompune@gmail.com

जावक क्र. आव्यप्रा/ 17 /2026 दिनांक : 17/01/2026

वाचले - 1. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005.
2. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, यांचे परिपत्रक क्र.: संकिर्ण-2019/प्र.क्र.199/एसडी-2, दि. 2/08/2019
3. पोलिस उप आयुक्त,वाहतूक शाखा, पुणे शहर यांचे पत्र क्र. पोउपआ/वाह/नियो/329/2026, दि. 17/01/2026

**आदेश,**

**ज्याअर्थी**, पुणे ग्रँड चॅलेंज टूर 2026 या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा दिनांक 19 जानेवारी 2026 ते 23 जानेवारी 2026 या कालावधीत पुणे जिल्ह्यात होणार असून दि. 29 ऑक्टोबर 2025 रोजी मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. दिनांक 19 जानेवारी 2026 रोजी प्रोलॉग रेस होणार आहे.

**आणि ज्याअर्थी**, वाचले क्र. 3 अन्वये, पुणे ग्रँड टुर 2026 अनुषंगाने पुणे शहर हद्दीतील प्रोलॉग स्पर्धा दि. 19 जानेवारी 2026 रोजी आयोजीत करण्यात आली आहे. सदर स्पर्धेसाठी फर्ग्युसन कॉलेज रोड, गणेशखिंड रोड, जंगली महाराज रस्ता व त्यास जोडणारे इतर उपरस्ते हे सकाळी 09:00 वा. पासुन ते सायंकाळी 06.00 वा. दरम्यान वाहतुकीसाठी पूर्ण बंद ठेवावे लागणार आहे. त्यामुळे सदर रोडच्या परिसरातील शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेता छत्रपती शिवाजीनगर घोले रोड, विश्रामबाग वाडा कसबा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध बाणेर, कोथरुड बावधन, सिंहगड रोड, वारजे कर्वेनगर पुणे महानगरपालिकेच्या या क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील शाळा महाविद्यालये व व्यावसायिक शैक्षणिक संस्था हे दि 19 जानेवारी 2026 रोजी पूर्ण वेळ बंद ठेवणे अत्यंत गरजेचे आहे.

**आणि ज्याअर्थी**, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम – 2005 मधील कलम 25 अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे 'अध्यक्ष' आहेत व वाचले क्र. 2 च्या परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आलेले आहेत.

**त्याअर्थी, मी जितेंद्र डूडी, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 मधील कलम 30 व 34 अन्वये आणि शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय मुंबईच्या शासन परिपत्रकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये पुणे ग्रँड चॅलेंज टूर 2026 या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या छत्रपती शिवाजीनगर घोले रोड, विश्रामबाग वाडा कसबा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध बाणेर, कोथरुड बावधन, सिंहगड रोड, वारजे कर्वेनगर या क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील सर्व अंगणवाडी, शासकीय व खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळा, आश्रमशाळा, मनपा व नगरपालिकेच्या शाळा, महाविद्यालये, आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र, व्यावसायिक शैक्षणिक संस्थाना दिनांक 19 जानेवारी 2026 रोजी होणाऱ्या प्रोलॉग रेस च्या दिवशी सुट्टी जाहिर करीत आहे.**

उक्त आदेशाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात यावी. सदरहू आदेश आज दिनांक 17 जानेवारी 2026 रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

जिल्हा दंडाधिकारी पुणे

jitendra
(जितेंद्र डूडी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे.**

प्रत,

1. मा. आयुक्त, महानगरपालिका, पुणे
2. मा. पोलिस आयुक्त, पुणे शहर आयुक्तालय
3. शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक, जिल्हा परिषद, पुणे
4. निबंधक, सर्व विद्यापीठ...................., जि. पुणे
5. सर्व संबंधित ..............................

Scanned with OKEN Scanner

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## परिपत्रक क्र. ०८/२०२६

पुणे ग्रँड चॅलेंज टूर, २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धा दिनांक १९ जानेवारी, २०२६ ते २३ जानेवारी, २०२६ या कालावधीत पुणे जिल्हयात होणार असून दिनांक २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते उद्‌घाटन करण्यात आले आहे. पुणे शहरात दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी प्रोलॉग रेस होणार आहे.

मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पुणे यांच्या संदर्भ जावक क्र.आव्यप्रा/१७/२०२६, दिनांक १७.०१.२०२६ रोजीच्या आदेशा नुसार पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेच्या अनुषंगाने पुणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी नगर घोले रोड, विश्रामबाग वाडा कसबा, ढोले पाटील रोड, भवानी पेठ, औंध बाणेर, कोथरुड बावधन, सिंहगड रोड, वारजे कर्वेनगर या क्षेत्रिय कार्यालयाचे हद्दीतील सर्व आंगणवाडी, शासकीय व खाजगी प्राथमिक/माध्यमिक शाळा, आश्रमशाळा, मनपा व नगरपालिकेच्या शाळा, महाविद्यालये, आयुक्त व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र, व्यावसायिक शैक्षणिक संस्थांना दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी होणाऱ्या प्रोलॉग रेस च्या दिवशी सुट्टी जाहिर करण्यात आलेली आहे.

सदर पार्श्वभूमीवर पुणे जिल्हयात होत असलेल्या पुणे ग्रँड चॅलेंज टूर २०२६ या आंतरराष्ट्रीय स्पर्धेअंतर्गत होणाऱ्या प्रोलॉग रेस करिता विद्यापीठ कार्यालयास दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी सुट्टी जाहीर करणे आवश्यक आहे.

**याबाबत प्राप्त आदेशानुसार, या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सोमवार, दिनांक १९ जानेवारी, २०२६ रोजी विद्यापीठ कार्यालयास सुट्टी जाहीर करण्यात येत आहे.**

तथापि, विद्यापीठ आस्थापनेतील स्थावर विभाग, सुरक्षा विभाग व आरोग्य केंद्र हे विभाग अत्यावश्यक सेवा अतंर्गत येत असल्याने सदर विभागांचे कामकाज नेहमीप्रमाणे सुरु राहील. सदर विभागातील संबंधितांना सदर दिवसाची पर्यायी रजा नंतर देय राहील. त्याचप्रमाणे कोणत्याही अत्यावश्यक कार्यालयीन कामकाजाकरिता वरिष्ठांनी संबंधितास कार्यालयात बोलविल्यास त्यांना कार्यालयामध्ये त्वरीत उपस्थित राहणे अनिवार्य राहील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

उपकुलसचिव<br>
प्रशासन शिक्षकेतर कक्ष

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७<br>
जा.क्र. : एएन/१८२<br>
दिनांक : १८/०१/२०२६

**सोबत :-** वरीलप्रमाणे.

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. मा.विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग<br>
२. मा.संचालक, सर्व प्रशाला<br>
३. मा.शाखाप्रमुख, सर्व प्रशासकीय शाखा

आपणास विनंती की, सदर परिपत्रकातील आशय संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

Scanned with OKEN Scanner

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १०४/२०२२

मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार परीक्षेच्या कालावधीमध्ये जे विद्यार्थी आंतरविद्यापीठीय, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरील सांस्कृतिक व क्रीडास्पर्धा अथवा इतर कार्यक्रमामध्ये सहभागी होणारे/झालेले असतील तसेच राष्ट्रीय सेवायोजना व राष्ट्रीय छात्रसेना योजना यामध्ये सहभागी होणारे/झालेले असतील अशा खालील पात्र विद्यार्थ्यांची परीक्षा आयोजनाची पर्यायी व्यवस्था करण्यात येत आहे.

१ ज्या विद्यार्थी खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील आशियाई किंवा ऑलिपिंक स्पर्धासाठी निवड झालेली आहे.

२ राज्यस्तरीय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवा योजना, वादविवाद स्पर्धा व मा. व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धामध्ये सहभागी होणारे/झालेले विद्यार्थी.

३. राष्ट्रीय शारीरीक कार्यक्षमता व विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण कार्यक्रम या स्पर्धामध्ये सहभागी होणारे/झालेले विद्यार्थी.

४. मा. कुलपती यांनी वेळोवेळी निर्देशित केलेल्या स्पर्धा (उदा. इंद्रधनुष्य, अश्वमेध, आविष्कार इ.) तसेच अखिल भारतीय विश्व विद्यालय संघ, नवी दिल्ली व केंद्र शासन व राज्य शासन यांनी आयोजित केलेल्या सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होणारे/झालेले विद्यार्थी.

५. तसेच समकक्ष विषय व इतर कारणांमुळे एकाच दिवशी, एकाच वेळेस दोन विषयांची परीक्षा येत असल्यास.

६. केंद्रिय प्रवेश प्रक्रिया (CET) राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET), राज्यस्तरीय पात्रता चाचणी (SET), C.A., CMA, UPSC, MPSC इत्यादी तत्सम परीक्षा व विद्यापीठ परीक्षा एकाच दिवशी येत असल्यास.

उपरोक्त नमूद पात्र असणाऱ्या व परीक्षा अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजनाबाबत पर्यायी व्यवस्था म्हणून विशेष परीक्षांचे आयोजन करण्यात येईल. त्या करीता विद्यार्थ्यांनी आपले अर्ज संबंधित महाविद्यालयात सर्व कागदपत्रांसह जमा करावे व मा. प्राचार्य/संचालक यांनी सदर अभ्यासक्रमाची परीक्षा संपल्यानंतर प्राधान्यक्रमाने दहा दिवसांच्या आत न चुकता सर्व कागदपत्रांसह संबंधित विद्यार्थ्यांचे विशेष परीक्षा आयोजनाचे प्रस्ताव परीक्षा विभागास दिलेल्या विहित मुदतीत सादर करावेत. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जानुसार केवळ पात्र विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा आयोजित करण्यात येईल व त्याबद्दल वेळोवेळी अवगत करण्यात येईल.

मा. प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करून विद्यापीठास सहकार्य करावे.

संदर्भ :— परीक्षा—समन्वय/३२६
दिनांक:— ०४ जुलै, २०२२

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,

Scanned with OKEN Scanner

# पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

<u>परीक्षा सुधारित परिपत्रक क्रमांक : १५३</u>

## विषय- खेळाडू विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा.

परीक्षा परिपत्रक क्रमांक २००/२००१ (संदर्भ क्रमांक परीक्षा-समन्वय/२१९८), दिनांक २७ जुलै, २००१ मधील तरतुदीनुसार ज्या विद्यार्थी खेळाडूंची राष्ट्रीय पातळीवरील, अशियाई वा ऑलिंपिक क्रिडा स्पर्धांसाठी निवड झाली आहे. अशा विद्यार्थ्यांची तसेच खालील दर्शविल्याप्रमाणे विशेष परीक्षा घेण्यात येते.

१. राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर राष्ट्रीय छात्रसेना, राष्ट्रीय सेवायोजना, वादविवाद स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, नाटय, मूट कोर्टस व मा. व्यवस्थापन परिषदेने वेळोवेळी मान्य केलेल्या स्पर्धा,

२. राष्ट्रीय शारीरिक कार्यक्षमता व पुणे विद्यापीठाचे प्रौढ शिक्षण कार्यक्रम या स्पर्धांमध्ये सहभागी होणा-या विद्यार्थ्यांचा विद्यापीठ परीक्षांचा कार्यक्रम तो भाग घेत असलेल्या स्पर्धाच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असेल तर अशा खेळाडू विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा (Special Examination) विद्यापीठ आयोजित करते.(सोबत परिपत्रकाची प्रत).

३. तसेच शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून परीक्षा परिपत्रक क्रमांक ४५६/२००४ (संदर्भ क्रमांक परीक्षा-समन्वय/१४०९) दिनांक २९.११.२००४ मधील तरतुदीनुसार आंतर महाविद्यालयीन/ आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या सत्रांत परीक्षांचा कार्यक्रम ते भाग घेत असलेल्या स्पर्धाच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असल्यास संबंधित विद्यार्थ्यांची विशेष सत्रांत परीक्षा संबंधित महाविद्यालय आयोजित करते.

४. पुणे विद्यापीठातील कार्यक्षेत्रातील वरीष्ठ महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थामधील खेळाडू तसेच आंतरविभागीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेले खेळाडू.(परीक्षा मंडळ ठराव क्रं. ३०/२०१३ (१६.०७.२०१३)

५. आंतर महाविद्यालयीन/ आंतर विभागीय क्रिडा स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांच्या सत्रांत परीक्षांचा कार्यक्रम ते भाग घेत असलेल्या स्पर्धाच्या कार्यक्रमाच्या बरोबरीने येत असल्यास संबंधित विद्यार्थ्यांची विशेष सत्रांत परीक्षा संबंधित महाविद्यालय आयोजित करते. सोबत परिपत्रकाची छायांकीत प्रत माहिती व संदर्भासाठी जोडली आहे.

६. विद्यापीठाचा अभ्यासक्रम बदलल्यामुळे, काही विद्यार्थ्यांची एकाच दिवशी, एकाच वेळेस दोन विषयांची परीक्षा येत असल्यास सदर विद्यार्थ्यांचीसुध्दा वरील विद्यार्थ्यांच्या विशेष परीक्षेबरोबर अशी परीक्षा आयोजित करण्यात येते.

विशेष परीक्षेचे अर्ज महाविद्यालय/मान्यताप्राप्त संस्था यांनी सोबत जोडलेल्या विहीत नमुन्यातील अर्जानुसार मा. प्राचार्य/संचालकांमार्फत सदर परीक्षा संपल्यानंतर १० दिवसाच्या आत या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जानुसार सदर विद्यार्थ्यांची विशेष परीक्षा (Special Examination) वेळेत आयोजित करण्यात येईल.

मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये /मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था यांना या परिपत्रकाद्वारे विनंती करण्यात येते की, या परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावा आणि योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

सोबत : वरीलप्रमाणे

गणेशखिंड, पुणे-७.

परीक्षा नियंत्रक

संदर्भ क्रमांक परीक्षा-समन्वय/९९२
दिनांक: २८.१०, २०१३
प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी-:

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये /मा. संचालक, मान्यताप्राप्त संस्था
२. मा. संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ
३. मा. संचालक, विद्यापीठ क्रीडा मंडळ
४. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सहायक
५. उपकुलसचिव (१,२,३ व ४)
६. सहायक कुलसचिव, (शैक्षणिक)
७. परीक्षा विभागातील सर्व सहायक कुलसचिव
८. परीक्षा विभागातील सर्व कक्षाधिकारी
९. केंद्र प्रमुख, विद्यापीठ उपकेंद्र, अहमदनगर व नाशिक



Scanned with OKEN Scanner